सकाळ
रविवार
२८ ऑक्टोबर २०१८
३



आमगाव : कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.

# आमगाव येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

आमगाव, ता. २७ : कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व तालुका कृषी अधिकारी कार्यालय आमगावच्या वतीने जिल्हाअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम येथील नगर परिषद सभागृहात घेण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हा परिषद सदस्य सुखराम फुंडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्य अशोक पटले तर, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य जियालाल पंधरे, मोहिनी निंबार्ते उपस्थित होते. या वेळी हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वय एन. एस. देशमुख, कीटकशास्त्रज्ञ आर. डी. चव्हाण, पंचायत समिती येथील पशुधनविकास अधिकारी शैलेंद्र पटेल, सहायक पशुधनविकास अधिकारी पी. आर. सय्यद, पशुधनविकास अधिकारी एस. पी. रहांगडाले, तालुका कृषी अधिकारी एल. एच. बन्सोड मार्गदर्शन केले. प्रास्ताविक राहुल सेंगर यांनी तर, संचालन सुषमा शिवणकर यांनी केले.

या वेळी उपस्थित शेतकरी व शेतकरी मित्रांना आत्मामार्फत बॅग, पेनचे वितरण करण्यात आले. यशस्वितेसाठी कृषी सहायक तुषार सुर्यवंशी, स्मित बागडे, जी. एल. शेंडे व एन. व्ही. मुंडे यांनी सहकार्य केले.